# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्र. १४-२२ दिनांक १३/०१/२०२२

**सिक्युरिटी गार्ड म्हणुन नोकरी करून घरुफोडी करणा-या नेपाळी गॅंगला नेपाळ बॉर्डरवरुन अटक करुन रु. ५,२४,४८०/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत- माणिकपुर पो. ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.**

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक ०७/०१/२०२२ रोजी सनसिटी परिसरामध्ये रात्रीच्या वेळी घरफोडी झाली होती. माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने सि.सि.टि.व्ही. कॅमेरे व तांत्रिक मदतीच्या आधारे रुपईडीहा चेक पोस्ट, नेपाळ बॉर्डर, जि. बहराईच, उत्तरप्रदेश येथुन सापळा रचुन एकुण तीन आरोपी नामे १) धरमराज दयाराम ढकाल ऊर्फ शर्मा, धंदा- वॉचमन, रा. मुळगाव बिनयका नगरपालीका, वडा नं. ७, कालीमाता मंदिराशेजारी, जि. अछाम, नेपाळ. २) राजेश पदम जोशी ऊर्फ तप्तराज पदमराज देवेकोटा, धंदा- वॉचमन, रा. मुळगाव लमकीचुआ नगरपालीका, वडा नं. २, चुलीमालीका क्लबशेजारी, जि. कोईलाली, नेपाळ व ३) अर्जुन ऊर्फ नरेश धरमराज ढकाल, धंदा- वेटर, रा. मुळगाव लम्की चुहा नगरपालिका, वॉर्ड नं. ०२, मोतीपुर, जि. कैलाली, अच्छाम, नेपाळ यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडून घरफोडीतील एकुण १२४ ग्रॅम सोन्याचे दागिने, रु. ६,८००/- रोख रक्कम व ३ मोबाईल फोन असे एकुण ५,२४,४८०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- २, श्री. प्रदीप गिरीधर, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. भाऊसाहेब आहेर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, माणिकपूर पोलीस ठाणे, पो.नि. अभिजित मडके (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि. सचिन सानप, पो.उ.नि. रोहिणी डोके, पो.ह.क्र. ०२०१२/शैलेश पाटिल, पो.ना.क्र. ०७०२८/धनंजय चौधरी, पो.ना.क्र. ०७०४१/शामेश चंदनशिवे, पो.शि.क्र. १४१३९/गोपाळ कोळेकर व पो.शि.क्र. १७०२६/प्रविण कांदे यांनी केलेली आहे.